# श्रीमती फिलिपा फुट यांच्या नव – निसर्गवादी मताचे चिकित्सक विवेचन

**डॉ. अतुल म. महाजन**
तत्त्वज्ञान विभाग,
रेणुका कॉलेज, नागपूर.
मो. नं. 8237059575

नैतिक भाषेच्या स्वरूपाविषयी व पर्यायाने नैतिक निर्णयाच्या स्वरूपाविषयीची समस्या फार जुनी असून सुद्धा ज्वलंत अशी समस्या आहे. या समस्येचे पूर्णपणे आणि समाधानकारक असे उत्तर आजतागायत प्राप्त झालेले दिसून येत नाही. याचे कारण असे की, ज्या विचारवंतांनी नैतिक निर्णयाविषयी विवेचना केली त्या सर्वांनी नैतिक निर्णयाच्या कोणत्याही एका कार्याकडे, स्वरूपाकडे, पैलूकडे अवधान केंद्रित केले. म्हणजेच प्रत्येक विचारवंत नैतिक निर्णयाचे कोणतेही एकच एक कार्य विचारात घेत असल्याचे आपण पाहिले. त्यांनी नैतिक निर्णयाचे अनेक पैलू किंवा अनेक छटा असू शकतात या बद्दल तीळमात्रही विचार केलेला दिसून येत नाही. प्रत्येक विचारवंत नैतिक निर्णयाच्या स्वरूपाविषयी एकांगी भूमिका स्वीकारतांना दिसून येतात. दुसरे असे की, काही अतिनीतिशास्त्रीय सिद्धांत नैतिक निर्णयाचे कार्य आणि अर्थाच्या स्वरूपात प्राथमिक अर्थ आणि दुय्यम अर्थ अशी भूमिका स्वीकारताना दिसून येतात. यावरून आपल्याला असे म्हणता येते की, ज्या विचारवंतानी नैतिक निर्णयाच्या स्वरूपाविषयी स्पष्टीकरण देण्याचा प्रयत्न केला त्यांना ही समस्या योग्यप्रकारे अवगत नसावी.

प्रस्तुत लेखात आपण श्रीमती फिलिपा फुट यांच्या नव–निसर्गवादी मताचे चिकित्सक अध्ययन करू. तत्पूर्वी फुट यांच्या मताचा थोडक्यात आढावा घेऊ.

१. फुट यांच्या मते कोणत्याही वस्तूला मनमानेल त्याप्रमाणे चांगले म्हणता येत नाही. फुट आपले नव–निसर्गवादी मत प्रतिपादन करताना आदेशवादी मताचे जोरकसपणे खंडन करतात. त्यांच्या मते एखाद्या वस्तूला चांगले म्हणण्याकरिता आपल्याला चांगलेपणाची निकषे किंवा कारणे माहीत असणे अनिवार्य असते. निकषाअभावी किंवा कारणाअभावी वस्तूला चांगले म्हणणे निरर्थक ठरते. अर्थात फुट नैतिक निर्णयाच्या संदर्भात वर्णनात्मक घटकाला प्राथमिकता देतात.

२. फुट नैतिक निर्णयाच्या संदर्भात वर्णनात्मक घटकाला प्राथमिकता देत असल्या तरी या संदर्भात मूल्यात्मक घटक, आदेशात्मक घटक अप्रस्तुत असल्याचे स्वीकारित नाही. त्या नैतिक निर्णयात मूल्यात्मक घटक, आदेशात्मक घटक अंतर्भूत असल्याचे मान्य करतात. परंतु हे मूल्यात्मक घटक किंवा मूल्यात्मक कार्य नैतिक निर्णयाचे प्राथमिक कार्य नसून गौण किंवा दुय्यम कार्य असल्याचे मान्य करतात.

३. फुट यांच्या मते चांगलेपणा आणि चांगलेपणा ठरविणारे गुणधर्म यामध्ये अनिवार्य संबंध असतो. गुण किंवा निकषाअभावी एखाद्या वस्तूला चांगले म्हणता येत नाही. अर्थात त्यांच्या मते ज्याप्रमाणे वस्तुस्थितीविषयक निवेदनाची प्रमाणिकता ठरविण्याकरिता निकषांची आवश्यकता असते, त्याचप्रमाणे नैतिक निर्णयाची प्रामाणिकता निकषाअभावी ठरविता येत नाही. अर्थात फुट वस्तुस्थितीविषयक निवेदन आणि नैतिक निर्णय यामध्ये फार भेद असल्याचे मान्य करीत नाही.

४. फुट नैतिक निर्णयाचा अनिवार्य संबंध व्यक्तीच्या हिताशी किंवा गरजेशी असल्याचे स्पष्ट करतात. त्यांच्या मते ज्या कृतीचा किंवा वस्तूचा व्यक्तीच्या हिताशी किंवा गरजेशी संबंध नसतो त्या कृतीला किंवा वस्तूला नैतिक म्हणता येत नाही. अशी कोणतीच कृती किंवा वस्तू नैतिक दृष्टीने चांगली किंवा वाईट असू शकत नाही जिचा मानवी हिताशी किंवा गरजेशी संबंध नसेल. म्हणजेच त्या नैतिक निर्णयाचा अनिवार्य संबंध व्यक्तीच्या हिताशी किंवा गरजेशी असल्याचे स्पष्ट करतात.

५. फुटच्या मते वस्तुस्थितीविषयक निवेदनावरून नैतिक निर्णय तार्किकीयरीत्या निर्गमित करता येतात. अर्थात त्यांच्या मते या दोन्ही निर्णयात फार असा भेद नसतो. आणि जे विचारवंत नैतिक निर्णय आणि वस्तुस्थितीविषयक निवेदनात भेद असल्याचे मान्य करतात, त्यांनी नैतिक शब्दाच्या व्यावहारिक उपयोग समजण्यात चूक केली आहे, असे फुट यांचे मत आहे. जर नैतिक शब्दाचे व्यावहारिक उपयोग योग्य प्रकारे अवगत झाले तर वस्तुस्थितीविषयक निवेदने आणि नैतिक निर्णय यात दिसून येणारा भेद नष्ट होतो.

१. फुट स्पष्ट म्हणतात की, नैतिक निर्णय आणि त्या अनुरूप आचरण करणे यामध्ये कोणत्याही प्रकारचा अनिवार्य संबंध असतो असे म्हणता येत नाही.

२. फुट नैतिक निर्णय आणि निवडप्रक्रिया यामध्ये अनिवार्य संबंध असल्याचे मान्य करीत नाही. त्या स्पष्ट म्हणतात की, वस्तूला चांगले म्हणण्याची अनिवार्य अट वस्तुची निवड करणे असू शकत नाही. वस्तू चांगली असण्याचे काही पूर्वनिर्धारित निकष किंवा कसोट्या असतात. या पूर्वनिर्धारित निकष किंवा कसोट्यांवरून वस्तूला चांगले म्हणण्यात येते. व्यक्तीने स्वत: स्वीकारलेल्या निकषांच्या आधारावरून वस्तूचा चांगलेपणा ठरविता येत नाही.

३. फुट यांच्या मते नैतिक निर्णयाच्या समर्थनाकरिता देण्यात येणाऱ्या युक्तिवादाचे स्वरूप आणि उद्देश व वस्तुस्थितीवषयक निवेदनाच्या समर्थनाकरिता देण्यात येणाऱ्या युक्तिवादाचे स्वरूप आणि उद्देश सारखे असते. समान वस्तुस्थितीच्या आधारे अर्थात सर्व गोष्टी समान असतील तर, एक व्यक्ती ज्या वस्तूला 'चांगले आहे' असे म्हणेल दुसरी व्यक्ती त्या वस्तूला 'चांगली नाही' असे म्हणू शकत नाही. या आधारावर त्या स्पष्ट करतात की वस्तूस्थितीविषयक निवेदनाप्रमाणेच नैतिक निर्णयाच्या समर्थनाकरिता एखाद्या वस्तूला प्रमाण म्हणून स्वीकारणे याविषयी आपली स्वतंत्रता निश्चितच सिमित आहे. म्हणजेच नैतिक निर्णयाचे समर्थन करावयाचे असेल तर आधार म्हणून वस्तुस्थितीचा उल्लेख करावा लागेल अर्थात त्या वस्तुस्थितीविषयक निवेदनावरून नैतिक निर्णय तार्किकीयरित्या निर्गमित करता येते हे मान्य करतात.

फुट यांच्या नव–निसर्गवादी मताचा थोडक्यात आपण आढावा घेतला. आता आपण फुट यांच्या नव –निसर्गवादी मतातील स्वीकारणीय आणि अस्वीकारणीय बाबींचा तपशीलात विचार करू.

१. फुट यांनी आपले नव – निसर्गवादी मत प्रतिपादन करताना नैतिक निर्णयाच्या संदर्भात व्यक्तिस्वातंत्र्य अमान्य केले आहे. आपण पाहिले आहे की, त्यांच्या मते कोणत्याही वस्तूला मनमानेल त्याप्रमाणे चांगले म्हणता येत नाही. फुट यांच्या या मताच्या समर्थनार्थ आपल्याला असे म्हणता येईल की, जर एखादी व्यक्ती एखाद्या वस्तूला चांगले म्हणत असेल तर ती वस्तू का चांगली आहे? असा प्रश्न आपण विचारू शकतो. अशावेळी त्या व्यक्तीला वस्तूच्या चांगलेपणाची कारणे देणे अनिवार्य ठरेल. जर ती व्यक्ती चांगलेपणाची कारणे देण्यास असमर्थ असेल तर त्या व्यक्तीद्वारे वस्तूला चांगली म्हणणे निरर्थक ठरेल. अर्थात वस्तूचा चांगलेपणा ठरविण्याकरिता कारणे किंवा निकषाचे ज्ञान असणे अनिवार्य असते. दुसऱ्या शब्दात नैतिक समर्थनाचा प्रश्न उपस्थित झाल्यास व्यक्तीला निकषे किंवा कारणे देणे अनिवार्य असते. यावरून कोणत्याही वस्तूला मनमानेल त्याप्रमाणे चांगले म्हणता येत नाही, हे फुट यांचे मत योग्य असल्याचे म्हणता येईल. दुसरे असे की फुट यांच्या या मतावरून ते वस्तुनिष्ठवादी असल्याचे स्पष्ट होते.

२. 'चांगले' या पदाचा मनमानेल त्याप्रमाणे वापर करता येत नाही, हे फुट यांचे मत आपण पाहिले. या संदर्भात असा प्रश्न उपस्थित होतो की, फुट यांना 'मनमानेल त्याप्रमाणे' या शब्दबंधाचा कोणता अर्थ अभिप्रेत आहे. 'मनमानेल त्याप्रमाणे' अर्थात कोणतेही निकष किंवा कारणे लक्षात न घेता एखाद्या शब्दाचा उपयोग करणे होय काय? अर्थात शब्दाचा स्वैर वापर करणे होय काय? परिस्थिती लक्षात न घेता, शब्दाच्या वापरीचे निकष लक्षात न घेता एखाद्या शब्दाचा वापर करणे होय काय? फुट यांना 'मनमानेल त्याप्रमाणे' या शब्दबंधाचा अर्थ

उपरोक्तप्रमाणे अभिप्रेत आहे काय? आणि जर त्यांना तसा अर्थ अभिप्रेत असेल तर त्यांनी आदेशवादावर घेतलेला आक्षेप अयोग्य असल्याचे म्हणता येईल. कारण आदेशवादी जरी 'चांगले' या पदाचा अर्थ माहित नसतांना त्याचा सार्थपणे वापर करता येतो. असे म्हणत असले तरी ते 'चांगले' या पदाचा मनमानेल त्याप्रमाणे वापर करतात असे म्हणता येत नाही. कारण आदेशवादी 'चांगले' या पदाच्या सर्व वापरात त्याचा आदेशात्मक किंवा प्रशंसात्मक अर्थ उपस्थित असल्याचे मान्य करतात. आणि म्हणून आदेशवादी 'चांगले' या पदाचा मनमानेल त्याप्रमाणे वापर करतात असे आपल्याला म्हणता येत नाही. त्यामते फुट यांनी या संदर्भात आदेशवादाविरूद्ध जो आक्षेप घेतला आहे, तो गैरलागू आहे. उपरोक्त आदेशवादाविरूद्ध जी भूमिका आपण स्वीकारलेली आहे, तिच भूमिका आपण भावनिकवादाविषयी स्वीकारू शकतो. भावनिकवादानुसार सुद्धा 'चांगले' या पदाच्या सर्व वापरात त्याचा भावनिक अर्थ हा विद्यमान असतो. अर्थात भावनिकवाद सुद्धा 'चांगले' या पदाचा मनमानेल त्याप्रमाणे वापर करता येतो असे स्वीकारित नाही. असे जरी असले तरी 'निकष माहीत नसतांना चांगले या पदाचा सार्थ वापर करता येतो, आणि तो वापर म्हणजे प्रशंसा करणे होय', हे आदेशवादी मत आपण स्वीकारित आहोत असे नाही. कारण एखादी व्यक्ती एखाद्या वस्तूची प्रशंसा करीत असेल, तर त्याला प्रशंसा का करतो आहे, हे सांगावे लागेल. म्हणजेच प्रशंसापर कारणे द्यावी लागेल. आणि जर तो कारणे देण्यास असमर्थ असेल तर तो त्यावेळेस प्रशंसा करीत नसून केवळ प्रशंसा करण्याचा अभिनय करतो आहे असे म्हणावे लागेल. अर्थात वस्तूला चांगले म्हणत असताना, 'चांगले' या पदाच्या अर्थाच्या संदर्भात आदेशवादी मत मान्य करता येणार नाही. या संदर्भात आपण फुट यांच्या मताशी – निकषाअभावी किंवा कारणांअभावी 'चांगले' या पदाचा वापर करता येत नाही – सहमत आहोत. या संदर्भात आदेशवादाविरूद्ध जी भूमिका आपण स्वीकारलेली आहे तीच भूमिका भावनिकवादाविरूद्ध स्वीकार करता येते.

अर्थात 'चांगले' या पदाद्वारे व्यक्ती प्रशंसा करीत असो किंवा भावना व्यक्त करीत असो, तसे करण्याची कारणे देणे त्याला अनिवार्य असते. म्हणजेच जोपर्यंत आपण एखाद्या कृतीचे नैतिक समर्थन करण्याच्या परिस्थितीत नसतो, तोपर्यंत कोणत्याही कृतीला आपण नैतिक म्हणू शकत नाही. अर्थात निकष माहित नसताना 'चांगले' या पदाचा वापर करता येत नाही, हे फुट यांचे मत आपण मान्य करीत आहो

३. कोणत्याही वस्तूला मनमानेल त्याप्रमाणे चांगले म्हणता येत नाही. वस्तूला चांगले म्हणत असताना चांगलेपणाची कारणे किंवा निकष माहीत असणे अनिवार्य असते. हे फुट यांचे मत आपण मान्य करीत असलो तरी, नैतिक निर्णयाचे प्रतिपादन करताना नैतिक निर्णयाच्या संदर्भात अनेक व्यक्तींमध्ये एकवाक्यता, एकमत असेलच असे म्हणता येत नाही. हे खुले सत्य आहे की, समाजात चालीरिती, कृती याविषयी मतभेद दिसून येतात. हे मतभेद कोणत्याही प्रकारचे भ्रम नव्हे. हे खरेखुरे मतभेद असतात. समाजातील चालीरितींमध्ये काळानूरूप घडून येणाऱ्या परिवर्तनाचे मूळ अशा मतभेदांमध्ये आपल्याला दिसून येते. यावरून हे सिद्ध होते की, नैतिक निर्णयाच्या स्वरूपात व्यक्तीनिष्ठतेचा घटक प्रभावीपणे क्रियाशील असतो. मात्र या घटकाला मनमानेल असे म्हणता येत नाही.

४. नैतिक निर्णयाच्या स्वरूपाविषयी फुट यांचे मत पाहिल्यानंतर आपल्याला असे म्हणता येईल की, नैतिक निर्णयाच्या संदर्भात कोणताही एक घटक वस्तुनिष्ठ किंवा व्यक्तीनिष्ठ घटकद्ध कार्यरत नसतो. कोणत्याही एका घटकाला विसरून नैतिक निर्णय देता येत नाही. कारण 'क्ष चांगले आहे' असे म्हणत असताना आपण 'क्ष' विषयी प्रतिपादन करीत असतो, म्हणजेच वस्तुविषयी आपण निर्णयात बोलत असतो. परंतु 'क्ष' ला चांगले म्हणत असताना आपल्या भावना, इच्छा, गरज, हित–अहित यांचा आधार आपण घेत असतो.
यावरून स्पष्ट होते की नैतिक निर्णय प्रतिपादतांना व्यक्तिनिष्ठ आणि वस्तुनिष्ठ असे दोन्ही घटक कार्यरत असतात.

५. फुट नैतिक निर्णयाच्या संदर्भात वर्णनात्मक कार्याला प्राथमिकता देतात व मूल्यात्मक कार्याला आदेशात्मक कार्यालाद्ध गौण किंवा दुय्यम असल्याचे मान्य करतात, हे आपण पाहिले आहे. फुट यांचे या संदर्भातील मत सुसंगत असल्याचे म्हणता येत नाही. याची कारणे पुढीलप्रमाणे– .

अ. फुट यांनी 'क्ष चागले आहे' या आकाराच्या नैतिक निर्णयाचे मूल्यात्मक कार्य आदेशात्मक कार्यद्ध गौण किंवा दुय्यम असल्याचे मान्य केले आहे, ते आपण मान्य करीत नाही. कारण 'क्ष चांगले आहे' किंवा 'क्ष योग्य आहे' या आकाराच्या नैतिक निर्णयाद्वारे कोणतेही निवडविषयक कार्य होत नसून, निवडविषय एखाद्या आदेशाचे, सूचनेचे किंवा मार्गदर्शनाचे समर्थन करता येते. निवड विषयक आदेश, सूचना किंवा मार्गदर्शन करणे आणि त्यांचे समर्थन करणे या दोन क्रिया संबंधित आहेत. परंतु त्या संबंधित आहे, यावरून त्या एकच नाही हे सिद्ध होते. म्हणून नैतिक निर्णयाद्वारे मूल्यात्मक कार्य केले जाते असे म्हणता येत नाही

ब. फुट नैतिक निर्णयाच्या संदर्भात गौण का होईना परंतु आदेशात्मक कार्याला स्थान देतात. म्हणजेच ते नैतिक निर्णयाद्वारे आदेशात्मक कार्य केले जाते याची शक्यता नाकारीत नाही. फुटच्या या मतावरून त्या पारंपरिक निसर्गवादापासून भिन्न असल्याचे स्पष्ट होते. त्या पूर्णत: वर्णनवादी असल्याचे म्हणता येत नाही. दुसरे असे की फुट नैतिक निर्णयाच्या संदर्भात आदेशात्मक कार्याला स्वीकारित असल्यामुळे त्यांचे नव–निसर्गवादी मत न–वर्णनात्मक किंवा न–ज्ञानात्मक मताच्या प्रभावातून पूर्णपणे मुक्त नाही असे आपल्याला म्हणता येते. न–वर्णनवादी किंवा न–ज्ञानात्मकवादी सिद्धांताचा प्रभाव त्यांच्या मतावर असलेला स्पष्टपणे दिसून येतो.

फुट नैतिक निर्णयाच्या संदर्भात आदेशवादी कार्य गौण रूपात का होईना स्वीकारित असल्यामुळे आदेशवादी मताविरूद्ध जे आक्षेप घेण्यात येतात तसेच आक्षेप फुट यांच्या नव–निसर्गवादी मताविरूद्ध घेण्याची शक्यता नाकारता येत नाही

क. फुट नैतिक निर्णयाच्या संदर्भात आदेशात्मक कार्याला दुय्यम स्थान देतात व दुसरीकडे चांगलेपणा आणि चांगलेपणा ठरविणारे गुणधर्म किंवा निकष यामध्ये अनिवार्य संबंध असल्याचे मान्य करतात. त्यांच्या या मतात एकप्रकारचा विरोधाभास असल्याचे दिसून येते. त्यामुळे नैतिक निर्णयाचे स्वरूपविषयीचे फुट यांचे मत सुसंगत असल्याचे मान्य करता येत नाही

६. फुट चांगलेपणा आणि चांगलेपणा ठरविणारे गुणधर्म यात अनिवार्य संबंध असल्याचे मान्य करतात. त्यांच्या या मताचे समर्थन करता येईल. कारण गुणधर्माअभावी कोणत्याच वस्तूला चांगले म्हणता येत नाही. तोपर्यंत चांगलेपणा ठरविणारे गुणधर्म किंवा निकष माहीत असणार नाही जेंव्हापर्यंत 'चांगले' या पदाचा वापर आपल्याला करता येणार नाही. गुणधर्माअभावी किंवा निकषांअभावी 'चांगले' या पदाचा वापर निरर्थक वापर ठरेल.

हे जरी मान्य असले तरी चांगलेपणा ठरविणारे गुणधर्म म्हणजेच निकष सर्व व्यक्तींसाठी सर्व परिस्थितीत समान किंवा सारखे असतील असे म्हणता येत नाही. दुसऱ्या शब्दात, चांगलेपणा ठरविणारे गुणधर्म म्हणजेच निकष वस्तू वर्गाच्या बाबतीत सर्व ठिकाणी आणि सर्व व्यक्तीसाठी, व्यक्ती समुहासाठी नेहमीच सारखे आणि कायम स्वरूपात असेल असे म्हणता येत नाही. अर्थात कृती किंवा वस्तूचा चांगलेपणा आणि त्या चांगलेपणाची निकषे ही कायम स्वरूपाची असेलच, राहीलच याची ग्वाही देता येत नाही. याचे उत्तम उदाहरण म्हणजे मानवी समाजात वेळोवेळी बदलणाऱ्या चालीरिती हे होय. स्त्रीचे शिक्षित होणे हे एकेकाळी चांगले समजले जात नव्हते, आज विपरीत परिस्थिती आपल्याला दिसून येते. पन्नास वर्षा आधीची मोटार साईकल ज्या निकषांमुळे तेव्हा चांगली समजण्यात येत होती, त्या मोटार साईकलीचे निकष आज बदललेल आहेत. यावरून स्पष्ट होते की, वस्तूचा किंवा कृतीचा चांगलेपणा आणि चांगलेपणा ठरविणारे गुणधर्म म्हणजेच निकष यात अनिवार्य संबंध आहे, असे जरी म्हणता येत असले तरी स्थळ, काळ, परिस्थिती, व्यक्ती, व्यक्तीसमुह यांच्या बाबतीत हे निकष समसमान किंवा सारखे असतीलच असे नाही, ते भिन्न भिन्न असू शकतात. म्हणजेच व्यक्तीपरत्वे चांगलेपणाचे

निकष भिन्न भिन्न असू शकतात. परंतु याचा अर्थ असा समजू नये की निकषाअभावी चांगलेपणा आपल्याला ठरविता येतो. यावरून आपल्याला असे म्हणता येईल की, व्यक्तीपरत्वे वस्तूच्या चांगलेपणाचे निकष बदलू शकतात. चांगलेपणा ठरविण्याकरिता निकष मान्य करावे लागतात हे मंजूर आहे, परंतु ती सर्वच व्यक्तींनी सारखी मान्य करावी हे मान्य करता येत नाही.

७. फुट चांगलेपणा आणि चांगलेपणा ठरविणारे गुण किंवा निकष यात अनिवार्य संबंध असल्याचे मान्य करतात. त्यांच्या या मताच्या संदर्भात असे म्हणता येईल की, त्या 'आंतरिकत: चागले' ही संकल्पना अमान्य करताना दिसून येतात. त्यांची ही भूमिका मला योग्य असल्याचे वाटते. कारण असे की एखादी वस्तू का चांगली आहे? असा प्रश्न उपस्थित झाला तर ही वस्तू चांगली असण्याचे म्हणणाऱ्या व्यक्तीला या प्रश्नाचे उत्तर देणे क्रमप्राप्त ठरते. या प्रश्नाचे उत्तर देणे म्हणजे ज्या वस्तूस आपण चांगले म्हणतो त्या वस्तुच्या चांगलेपणाचे त्या व्यक्तीस मान्य असणारे किंवा बहुमान्य झालेले निकष सांगणे होय. दुसऱ्या शब्दात, 'क्ष' ही वस्तू का चांगली आहे हा प्रश्न समर्थन विषयक प्रश्न ठरतो. नैतिकतेच्या क्षेत्रात त्याला नैतिक समर्थनाच प्रश्न म्हणू. ज्या कृतीचे नैतिक समर्थन करता येत नसेल म्हणजेच ती कृती का चांगली आहे याची कारण किंवा निकष देता येत नसतील तर अशी कृती एखाद्या व्यक्तीने करावी, हे उद्दिष्ट नैतिक निर्णयाच्या मुळाशी असते, अशी आदेशवादी भूमिका हास्यास्पद आणि म्हणूनच अस्वीकार्य ठरेल. परिणामी नैतिक समर्थनाची समस्या सार्थ ठरावयाची असेल तर कृतीच्या चांगलेपणाची किंवा योग्यायोग्यतेची कारणे किंवा निकष सांगता येणे अनिवार्य ठरते. मात्र 'आंतरिकत: चांगले' या संकल्पनेच्या सेदर्भात नैतिक समर्थनाचा प्रश्नच उद्भवणार नाही. तो उद्भवणार नाही यावरूनच 'आंतरिकत: चांगले' ही संकल्पना अशी अनुपयुक्त आणि गैर आहे हे स्पष्ट होते. या संकल्पनेच्या संदर्भात परस्परावलंबित्वाची संकल्पना स्वीकारून तथाकथित 'आंतरिकत: चांगले' ही संकल्पना सुद्धा वास्तविकत: तशी नसून बाह्यत: चांगली असते असे म्हणता येते. अर्थात कुठल्याही वस्तूचा चांगलेपणा निकषाअभावी ठरविता येत नाही, हे स्पष्ट व्हावे.

एकंदरीत फुट यांच्या मताचे अवलोकन केले असता आपल्याला असे म्हणता येईल की, फुट यांचे नैतिक निर्णयाच्या स्वरूपाविषयीचे मत हे मुख्यत: वर्णनात्मक किंवा ज्ञानात्मक असल्याचे दिसते. याचे कारण असे की, त्या नैतिक निर्णयाचे प्राथमिक कार्य वर्णनात्मक असल्याचे मान्य करतात. दुसरे असे की, त्यांच्या मते नैतिक निर्णयाच्या सार्थकतेकरिता निकषांची आवश्यकता असते. तसेच त्या नैतिक निर्णय आणि वस्तुस्थितीविषयक निर्णय यात भेद असल्याचे मान्य करीत नाही. त्यांचे स्वरूप सारखे असल्याचे स्वीकारतात. अर्थात हे स्पष्ट होते की फुट नैतिक भाषेला ज्ञानात्मक भाषेच्या वर्गात समाविष्ट करतात.

## संदर्भ ग्रंथ सूची

1- Ayer, A. J. Language, Truth and Logic, Penguin Books, England, Reprint, 1987.
2. Bali, D. R. -Introduction to Philosophy, Sterling Publishers Pvt. Ltd., New Delhi, Reprint, 1992.
3. Bentham, Jerome Introduction to Principles of Morals and Legislation, Hafner, NewYork, 1948.
4. Bharadwaja, V. K. Naturalistic Ethical Theory, Delhi University, Delhi, 1978. 5. Brandt, R. B. Ethical Theory, Prentive-Hall Inc., Anglewood Clipps, First edition, 1959.
6. Foot, Phillippa Theories of Ethics, Oxford University, London, Reprint,1968.
7. Frankena, William k. Ethics, Prentice-Hall of India Pvt. Ltd., New Delhi, Second edition, 1988.
8. Halverson, William H. A Concise Introduction to Philosophy, Random House, New York, Third edition, 1976.
9. Hare, R. M. Freedom and Reason, Oxford University Press, London, 1963.
10. Hare, R. M. Language of Morals, Oxford University Press, London, 1952.